ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५


# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १५ एप्रिल, १९५९ | अंक १५


## विविध माहिती

**कम्युनिझमची भीति नाहीं**—भूदानाचे प्रणेते आचार्य विनोबा भावे पंजाबमध्यें दौऱ्यावर असतां, त्यांनीं एका इटालिअन वृत्तपत्राला मुलाखत देऊन असें सांगितलें कीं, सर्वोदयाच्या मार्गानें हिंदमधील दारिद्र्य दूर करण्यांत आलें तर कम्युनिझमची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. शिवाय, भारतामधील जनतेचा परमेश्वरावर हजारों वर्षें विश्वास आहे. तोहि जबरदस्त अडसर आहेच.

**मनाच्या रोगांकडे लक्ष द्या**—हैद्राबाद येथें जागतिक आरोग्यदिन साजरा करण्याच्या प्रसंगीं आंध्रचे एक मंत्रि म्हणाले कीं, वैद्यकीय व्यवसायानें केवळ शारीरिक रोगांवर उपाय करून भागणार नाहीं. त्या व्यावसायिकांनीं मनाच्या रोगांवरहि उपचार केले पाहिजेत. विशेषतः अल्पवयीन गुन्हेगारांकडे लक्ष केंद्रित करण्यांत आलें पाहिजे.

**पश्चिम जर्मनीची पाकिस्तानला मदत**—पश्चिम जर्मनी व पाकिस्तान ह्यांच्यांत एक मदतीचा करार करण्यांत येणार आहे. करारप्रमाणें जर्मनी पाकिस्तानला ३ कोटी मार्कसचें कर्ज देईल. कर्जाचा उपयोग निर्वासित शेतकऱ्यांच्या पुनर्वसाहतीसाठी मुख्यतः करावयाचा आहे. करारांचीं बोलणीं पाकिस्तानच्या उपपंतप्रधानांनीं स्वतः केली.

**आर्ट गॅलरीसाठी वस्तू**—नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट ह्या संस्थेसाठी मद्रास येथें ६०० वस्तू विक्रीसाठी आल्या होत्या. खरेदी-कमिटीनें त्यापैकीं २० वस्तू विकत देण्याचें ठरविलें आहे. त्यांत तैलचित्रें, शिल्प व इतर कलात्मक वस्तूंचा भरणा आहे. खरेदीसाठी १०,००० रुपये लागले.

**भारताच्या दारिद्र्याचें निदान**—लाइफ-टाइम इंटरनॅशनल ह्या अमेरिकन नियतकालिकाचे डायरेक्टर मि. एडगर बेकर मुंबई येथें बोलतांना म्हणाले कीं, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विकासांत दोन मोठे अडथळे आहेत. एक म्हणजे भांडवलाचा अभाव व दुसरा म्हणजे तांत्रिक ज्ञानाचा अभाव. उलटपक्षीं, अमेरिकेपाशीं परदेशी गुंतविण्यासाठी भरपूर भांडवल आहे.

**पॉल रॉबसनची लोकप्रियता**—शेक्सपिअरच्या स्मृतीसाठी स्थापन करण्यांत आलेल्या नाट्यसंस्थेनें आपला १०० वा हंगाम साजरा केला. ह्या प्रसंगीं 'ऑथेल्लो' ह्या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. मुख्य भूमिका पॉल रॉबसन हे निग्रो गायक करणार असल्यामुळें ह्याच नाटकाच्या ५० प्रयोगांचीं तिकिटें पहिल्या प्रयोगाच्या आधींच संपलीं होतीं.

**तेलघाणीवाल्यांची परिषद**—भागलपूर येथें अखिल भारतीय तेलघाणी-सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची परिषद भरली होती. अशा ३,००० सहकारी संस्थातर्फे सुमारें १,००० प्रतिनिधी परिषदेसाठी जमले होते. तेल गाळण्याचा धंदा हा खेड्यांतील एक महत्त्वाचा उद्योग आहे. एकट्या बिहारमध्यें तेल-उत्पादकांच्या ८०० सहकारी संस्था आहेत.

**माणसाचें मजबूत हृदय**—जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत काम करणारें माणसाचें हृदय अतिशय मजबूत आहे. ते २ अब्ज वेळां ठोके देत असतें, व ८०० गॅलन रक्त रोज फिरवीत असतें. ह्याच्या उलट, उत्तमांत उत्तम पोलादाचें बांधलेलें मोटारीचें एंजिन जास्तींत जास्त २० कोटी ठोके देऊं शकतें. त्यानंतर तें निकामी होतें.

**घड्याळांच्या निर्मितीच्या योजना**—परदेशी कारखानदारांच्या सहकार्यानें भारतांत घड्याळें तयार करण्याच्या १५ योजना भारतीय उद्योगपतींनीं मध्यवर्ती सरकारला सादर केल्या आहेत. ह्यापैकी पांच किंवा सहा योजना विशेष आकर्षक असून सरकार त्यासंबंधीं विचार करीत आहे. परदेशीय कंपन्यांचें सहकार्य मिळविण्याबाबतहि वाटाघाटी चालू आहेत.

**सेवानिवृत्त झालेले आय. सी. एस्.**—भारत स्वतंत्र झाल्यापासूनच्या दहा वर्षांच्या कालांत मध्यवर्ती सरकारनें १४१ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना खाजगी उद्योगधंद्यांच्या विभागांत अगर आंतरराष्ट्रीय संघटनांत काम स्वीकारण्यास परवानगी दिली. त्यांपैकीं ५० अधिकारी आय. सी एस्. अगर आय. ए. एस. होते. तीन अधिकारी मुंबई राज्यांतील होते.

**चहाच्या मळ्यांचा गैरकारभार**—चहाच्या मळ्यांपैकीं जे कारखाने गैरकारभारानें त्रस्त झालेले असतील अगर जे बंद पडले असतील, ते आपल्या ताब्यांत घेण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ह्यासाठी सरकारला कायदा करून अधिकार घ्यावे लागतील. पार्लमेंटच्या पुढील अधिवेशनांत जरूर तें बिल मांडण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## निवडक लिमिटेड कंपन्यांच्या व्यवहाराचे तुलनात्मक आकडे

### विक्रींत वाढ, नफ्यांत घट, किफायशीरपणास बाध

डिसेंबर, १९५७ अखेरच्या तिमाहींत ज्या कंपन्यांचें वर्ष संपलें, अशांपैकी ४५८ पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या हिशेबांची छाननी येथें करण्यांत आली आहे. त्यांत १२४ कपास कापडाच्या गिरण्या असून बाकीच्या इंजिनिअरिंग, खनिज तेलें, चहाचे मळे, इत्यादिविषयक कंपन्या आहेत.

ह्या ४५८ कंपन्यांचें विक्रीचें उत्पन्न ५९·२ कोटी रुपयांनीं वाढून तें ६८७·७ कोटी रु. झालें म्हणजे, विक्रींत ९·४% वाढ झाली. तयार शिलकी माल व यंत्रांवरील माल ह्यांची किंमतहि ९९·७ कोटी रुपयांवरून ११३·३ कोटी रु. झाली. उत्पादनखर्च १२·४% नें वाढून तो ४२१·५ कोटी रु. झाला. पगार व मजुरी ९·१ कोटी रुपयांनीं वाढली; मजुरांच्या सुखसंवर्धनयोजनांवरील खर्च १०·१ कोटी रुपयांवरून ११·५ कोटी रुपयांवर गेला. एक्साइज ड्यूटीचा बोजा ५·९ कोटी रुपयांनीं वाढून तो ३०·७ कोटी रु. झाला. दिलेल्या व्याजांत २·४ कोटी रुपयांची वाढ झाली. मॅनेजिंग एजंटांचें वेतन ४६% नें उतरलें; ५·३ कोटी रुपयांवरून तें २·९ कोटी रुपयांवर आलें. इतर खर्चांत ८·०% नें वाढ झाली. घसाऱ्याची तरतूद १७·९ कोटी रु. च्या ऐवजीं १८·९ कोटी रु. झाली.

कराची तरतूद करण्यापूर्वीचा नफा ५३·४ कोटी रुपयांवरून ३७·३ कोटी रुपयांवर उतरला. म्हणजे त्यांत ३०·०% घट झाली. उत्पादनखर्च, पगार व मजुरी आणि एक्साइज ड्यूटीचा चढीचा दर ह्या घटीस मुख्यतः कारणीभूत आहेत. कराची तरतूद २१·६ कोटी रु. करण्यांत आली, म्हणजे १९५६ च्या मानानें ती १·२ कोटी रुपयांनीं कमी आहे. कराची तरतूद केल्यानंतरचा नफा ३०·६ कोटी रुपयांवरून १५·७ कोटी रुपयांवर घसरला; म्हणजे त्यांत ४८·६% घट झाली. वाटलेल्या डिव्हिडंडची रक्कम २·३ कोटी रुपयांनीं कमी होऊन ती १६·२ कोटी रु. भरली. पुष्कळ उद्योगधंद्यांनीं नफ्यांत वाढ दाखविली, तर कपास कापडाच्या गिरण्यांचा नफा १७·२ कोटी रुपयांवरून ४·३ कोटी रुपयांवर घसरल्या कारणानें सर्व कंपन्यांचा एकूण नफाहि खाली आला.

कंपन्यांचा नफा दोन प्रकारांनीं मोजतां येतो. (अ) ठोक नफ्याचें ठोक विक्रीशीं प्रमाण, आणि (ब) ठोक नफ्याचें एकूण गुंतलेल्या भांडवलाशीं प्रमाण दोन्ही दृष्टींनीं पहातां, कंपन्यांचा किफायशीरपणा घटला आहे. [(अ) १०·३% वरून ७·०% आणि (ब) ११·०% वरून ७·७%]

**हुंडाविरोधी बिलाचा मसुदा**—मध्यवर्ती सरकारनें लग्नप्रसंगीं हुंडा देण्या-घेण्यास बंदी करणाऱ्या कायद्याचा मसुदा तयार केला आहे. बिल पार्लमेंटच्या चालू अधिवेशनांतच मांडलें जाण्याचा संभव आहे. बिलांतील तरतुदीप्रमाणें वराला हुंडा अगर देणग्या म्हणून जास्तींत जास्त २,००० रुपयांची रक्कम ठरविण्यांत आली आहे.

**आसाममधील नैसर्गिक वायू**—आसाममधील नैसर्गिक वायूचा उपयोग करून काढावयाच्या दोन-तीन उद्योगधंद्यांसंबंधीचे अहवाल भारत सरकारनें एका इटालिअन कंपनीकडून मागविले आहेत. ऑइल इंडिआ लि. ह्या कंपनीकडे असलेल्या प्रदेशांतून,

## उत्पन्न, खर्च व नफावांटणी

### ४५८ कंपन्यांचे एकत्रित तुलनात्मक आंकडे

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| | १९५६ | १९५७ |
|---|---|---|
| **खर्च व नफावांटणी** | | |
| १. प्रारंभींचा स्टॉक | ७७,८१ | १००,१० |
| २. कच्चा माल व इतर उत्पादन खर्च | ३७४,९३ | ४२१,४९ |
| ३. पगार व मजुरी | ११४,३२ | १२३,४३ |
| ४. कामगारांचें सुखसंवर्धन | १०,०९ | ११,५१ |
| ५. बुडीत कर्जें | २१ | १३ |
| ६. एक्साइज ड्यूटी | २४ ७'१ | ३०,६९ |
| ७. व्याज | ५,९१ | ८,२९ |
| ८. मॅनेजिंग एजंटाचें वेतन | ५,२७ | २,८५ |
| ९. इतर खर्च | ४८,९८ | ५२,८८ |
| १०. घसाऱ्याची तरतूद | १७,९२ | १८,८७ |
| ११. करापूर्वी नफा | ५३,३६ | ३७,३० |
| १२. वजा कराची तरतूद | २२,८० | २१,५९ |
| १३. करानंतरचा नफा | ३०,५६ | १५,७१ |
| (अ) डिव्हिडंड | १८,४८ | १६,१५ |
| (ब) न वांटलेला नफा | १२,०८ | –४४ |
| १४. एकूण | ७३३,६५ | ८०७,५४ |
| **उत्पन्न** | | |
| १५. विक्री (मुख्य उत्पन्न) | ६२८,४४ | ६८७,६७ |
| १६. इतर उत्पन्न | ५,३९ | ६,६१ |
| १७. वर्षअखेर तयार माल व यंत्रावरील माल | ९९,७२ | ११३,२६ |
| १८. एकूण | ७३३,५५ | ८०७,५४ |

दररोज ३·२ कोटी घनफूट नैसर्गिक वायूचें उत्पादन होऊं शकेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**हिंदी चित्रपटांना बंदी**—१९५४ च्या जुलै महिन्यापूर्वी जे हिंदी चित्रपट पाकिस्तानांत आयात करण्यांत आले आहेत, ते दाखविण्यास पश्चिम पाकिस्तानमध्यें बंदी करण्यांत आली आहे. पाकिस्तानी चित्रपट अधिक प्रमाणांत दाखविले जावे म्हणून ही बंदी करण्यांत आली आहे. बंदीमुळें सुमारें ५६३ हिंदी चित्रपट ह्यापुढें दाखविण्यांत येणार नाहींत.

**अन्नधान्याच्या किंमती**—अन्नधान्याच्या बाजारावर नियंत्रण ठेवणें शक्य व्हावें म्हणून मध्यवर्ती सरकार चालू वर्षी धान्याचा साठा करून ठेवणार आहे. सुमारें २० ते ३० लाख टन तांदूळ व गहूं सरकार देशांतच खरेदी करण्याचा संभव आहे. ह्या सांठ्यापैकीं कांहीं सांठा आयात केलेल्या धान्यांतूनहि करण्यांत येईल. सरकार करणार असलेल्या खरेदीच्या किंमती अद्याप जाहीर झालेल्या नाहींत.

**पाकिस्तानचा पंचवार्षिक कार्यक्रम**—पाकिस्तानच्या पंचवार्षिक कार्यक्रमाची संपूर्ण पूर्तता होणार नाहीं, असें मत पाकिस्तानच्या नियोजन समितीच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञांनीं व्यक्त केलें आहे. त्यांच्या मतानें सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां उत्पादनाच्या उद्दिष्टांपैकीं दोनतृतियांश उद्दिष्टेंच कार्यक्रमाअखेरीस पुरी होण्याची शक्यता आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १५ एप्रिल, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनची पुस्तकांची निर्यात

देशा-देशांमधील स्नेहाचे संबंध दृढ होत जाण्यास व्यापाराप्रमाणेंच पुस्तकांचीहि मोलाची मदत होते. ही गोष्ट ओळखून ब्रिटनकडून कॉमनवेल्थ राष्ट्रगटांत होणारी पुस्तकांची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. राष्ट्रगटांतर्गत व्यापारावर परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें विपरीत परिणाम होतो. परंतु पुस्तकांच्या बाबतींत ही टंचाई फारशी अनुपकारक होऊ देण्यांत येत नाहीं. शिवाय कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील राष्ट्रांचे ऐतिहासिक संबंध बरेच जुने असल्यामुळें ह्या देशांत इंग्रजी जाणणारा वाचकांचा वर्गहि मोठा झालेला आहे. अलीकडे अमेरिका आणि रशिआ स्वस्त किंमतींचीं पुस्तकें परदेशांत फार मोठ्या प्रमाणावर पाठवींत असतात. ह्या बाबतींत ते देश ब्रिटनच्या थोडेसे पुढेंच आहेत. ब्रिटनमधील पुस्तकांच्या किंमती फार असतात. त्यामुळें तीं विकत घेणें भारतासारख्या गरीब देशांना अवघड जातें. म्हणून स्वस्त पुस्तकें निर्यात करण्याची एक योजना ब्रिटन तयार करीत आहे. स्वस्त किंमतींचीं पुस्तकें निर्यात करण्याच्या बाबतींत रशिआनें एवढी आघाडी मारलेली आहे कीं, ह्या प्रकरणाची ब्रिटिश पार्लमेंटमध्यें वाच्यता करण्यांत आली. ब्रिटनमधून पूर्व-युरोपांत पुस्तकें पाठविण्यास बंदी आहे. ह्या गोष्टीचा उल्लेख करून एका हुजूरपक्षीय सभासदानें असें सांगितलें कीं, रशिआकडून पूर्व युरोपांतील देशांना वाटेल तेवढीं स्वस्त पुस्तकें मिळत असल्यामुळें ह्या बंदीला कांहीं अर्थ राहिलेला नाहीं. ब्रिटनमधून स्वस्त पुस्तकें आलीं तर भारताच्या प्रकाशकांना फारशी स्पर्धा होण्याची शक्यता नाहीं. कारण भारतामधील स्वस्त इंग्रजी पुस्तकें अभिजात वाङ्मयाचीं नाहींत.

---

## भारताच्या चहाच्या किंमती फार भारी आहेत

इराणच्या चहा-संघटनेचे अध्यक्ष श्री. मनसुरी सध्यां भारतामधील चहाच्या मळ्यांचा दौरा करीत आहेत. चहाच्या उत्पादनाची पद्धत व संस्करण ह्यांची पहाणी करण्याचा त्यांचा हेतु आहे. आसाममधील कांहीं मळे पाहून आल्यावर कलकत्ता येथें बोलतांना ते म्हणाले कीं, भारतामधील चहाच्या किंमती जास्त आहेत. भारत सरकारनें त्या कमी केल्या तर इराणमध्यें अधिक चहा खपण्यासारखा आहे. भारतामधील चहाची प्रत चांगली असते. जगाच्या बाजारपेठेंत भारताच्या चहाला चांगलें स्थान आहे. तरीसुद्धां गेल्या दोन वर्षांत भारताकडून इराणमध्यें आयात करण्यांत येणाऱ्या चहांत घट झालेली आहे. दोन वर्षांपूर्वीं इराणमध्यें जितका चहा खपत होता त्याच्या ७५ टक्के चहा भारतामधून येत असे. पण त्यानंतर मात्र आयात २० टक्क्यांवर आली आहे. गेल्या दोन वर्षांत इराणनें आपल्याला लागणाऱ्या १८ ते २० हजार टन चहापैकी ६० ते ७० टक्के चहा सीलोनकडून आयात केलेला आहे. खुद्द इराणमध्यें ७,००० टन चहाचें उत्पादन करण्यांत येतें. चहाची लागवड सुमारें २७,००० एकर जमिनींत करण्यांत येतें. ही लागवड सरकाच्या पाठिंब्यानेंच करण्यांत येतें. सीलोनमधून चहा घेण्याचें एक कारण म्हणजे दळणवळणाची सुलभता. कोलंबो बंदर आंतरराष्ट्रीय जलमार्गावर सोयीस्कर रीतीनें वसलेलें आहे. उलटपक्षीं, ईशान्य भारतामधील चहा आयात करावयाचा झाल्यास फार दूरचा जलमार्ग स्वीकारावा लागतो सीलोनमधील चहाचें संस्करण वर्षभर चालू असतें. भारतांत मात्र ते आठच महिने चालतें. त्यामुळें भारताच्या चहापेक्षा सीलोनचा चहा स्वस्त पडतो. अर्थातच, इराण त्या देशाकडून अधिक आयात करतो.

---

## हिंदी डॉक्टराचें महत्त्वाचें संशोधन

माणसाच्या ज्ञानेंद्रियांपैकी सर्वांत नाजूक व महत्त्वाचें ज्ञानेंद्रिय डोळा हें समजलें जातें. त्यामुळें आंधळ्यांची जितकी कींव करण्यांत येते तितकी इतरांची करण्यांत येत नाहीं. ज्या लोकांना शस्त्रक्रियेच्या साह्यानें दृष्टि परत मिळण्याचा संभव असतो त्यांच्यासाठी मोफत शस्त्रक्रियेचीं शिबिरें मधून मधून खोलण्यांत येतात. आंधळ्यांना नवी आशा देण्यासारखें महत्त्वाचें संशोधन कॅनडांत गेलेल्या एका हिंदी डॉक्टरनें केल्याची वार्ता आहे. ह्या डॉक्टराचें नांव डॉ. पी. के. बसू असें असून ते कोलंबो योजनेप्रमाणें कॅनडाला गेले होते. सध्यां ते कलकत्त्याला परत आले आहेत. मृतप्राय माणसाचीं बुबुळें त्याच्याच संमतीनें त्याच्या मरणानंतर आंधळ्यांच्या डोळ्यांत कलम करण्यांत आल्याच्या वार्ता मधून मधून ऐकूं येतात. पण मृतप्राय माणूस स्वतःच्या बुबुळांची अशी देणगी देण्याचे प्रसंग विरळाच असतात. डॉ. बसू ह्यांनीं बुबुळांच्या कलम करण्याच्या पद्धतींत नवीन संशोधिन केलें आहे. त्यांच्या ह्या पद्धतीमुळें गुरांच्या डोळ्यांतील बुबुळाच्या जरूर त्या भागाचा उपयोग करतां येणें शक्य कोटींत आलें आहे. ह्या बाबतींत एक अडचण अशी आहे कीं, प्रत्येक बुबुळाचें स्वतःचें असें खास वैशिष्ट्य असतें. त्यामुळें बुबुळाच्या नसा आपल्या नव्या जागीं जीव धरीत नाहींत. डॉ. बसू ह्यांनीं केलेल्या संशोधनामुळें बुबुळाच्या कलम करण्याच्या मार्गांतील ही अडचण दूर झाली आहे असें म्हणतात. कॅनडाच्या वैद्यकीय व्यवसायांत डॉ. बसू ह्यांच्या संशोधनामुळें बरीच खळबळ माजली आहे. डॉ. बसू ह्यांनीं बुबुळें गोठवून ठेवण्याची एक पद्धतहि शोधून काढली आहे. त्यामुळें रक्ताच्या बँकेप्रमाणें बुबुळांची बँक स्थापन करणें शक्य होईल असें म्हणतात.

---

## मुंबई राज्याची साखरेची निर्यात

मुंबई राज्यांतील साखर कारखान्यांनीं १९५७-५८ च्या मोसमांत ३.२ लक्ष टन साखरेचें उत्पादन केलें. १३ कारखान्यांनीं ५,८५० टन साखरेची निर्गत केली.

# BHOR STATE BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 | CAPITAL & LIABILITIES | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital*: | | |
| 5,00,000—00 | 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—00 |
| | *Issued and Subscribed Capital*: | | |
| 5,00,000—00 | 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—00 |
| 2,50,000—00 | Amount called up and Paid up at Rs. 25/- per share.... | | 2,50,000—00 |
| 81,164—87 | **2. Reserve Fund and Other Reserves** ... | | 85,764—87 |
| 47,500—00 | Reserve Fund ... | 49,100—00 | |
| Nil | Investment Reserve Fund ... | Nil | |
| 3,534—50 | Investment Fluctuation Fund ... | 3,534—50 | |
| 30,130—37 | Reserve for Bad and Doubtful Debts ... | 33,130—37 | |
| 13,46,933—52 | **3. Deposits and Other Accounts:** | | 14,31,841—47 |
| 4,54,150—00 | Fixed Deposits ... | 5,39,750—00 | |
| 6,02,623—25 | Saving Bank Deposits ... | 6,64,793—52 | |
| 2,90,160—27 | Current Account, Contingency Accounts Etc. ... | 2,27,297—95 | |
| 49,655—82 | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | 37,493—28 |
| 49,655—82 | (i) In India ... | 37,493—28 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | |
| | **Particulars** | | |
| 49,655—82 | (i) Secured against Govt. securities, shown as per contra. ... | 37,493—28 | |
| Nil | (ii) Un-Secured ... | Nil | |
| 19,093—54 | **5. Bills for Collection, being Bills Receivable as per contra:** | | 11,287—12 |
| 19,093—54 | (i) Payable in India ... | 11,287—12 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | |
| 25,628—00 | **6. Other Liabilities** | | 24,660—86 |
| 1,890—00 | (i) For Expenses. ... | 2,643—00 | |
| 16,709—81 | (ii) Provided Fund, partly Invested as per Contra... | 19,513—34 | |
| 2,977—38 | (iii) Un-paid Dividends. ... | 2,504—52 | |
| 4,050—81 | (iv) Branch Adjustment. ... | Nil | |
| Nil | **7. Acceptances, Endorsements and other Obligations as per contra:** ... | | Nil |
| 17,72,475—75 | Carried over Rs. ... | | 18,41,047—60 |

# LIMITED BHOR.

## AT 31st DECEMBER, 1958

| 31-12-1957 | PROPERTY & ASSETS | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| 1,25,144—13 | 1. **Cash** In hand and with the Reserve Bank and State Bank (Including Foreign Currency Notes) ... | | 1,43,954—44 |
| 4,449—31 | 2. **Balances with Other Banks** (In current account) | | 43,899—05 |
| 4,449—31 | (1) In India ... | 43,899—05 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | |
| Nil | 3. **Money at Call and Short Notice** ... | | 50,000—00 |
| 8,70,455—37 | 4. **Investments at cost** | | 8,76,955—37 |
| 8,70,100—00 | (Face Value Rs. 8,73,000/- ) | | |
| 8,16,347-95 | (Market „ Rs. 8,34,340-55 ) | | |
| 8,72,810—37 | (1) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities, including Treasury Bills of the Central and State Govts. (Of these Securities of the Face Value of Rs.17,872-87/- are earmarked for Provident Fund as per Contra. Securities of the Face Value of Rs. 5,50,000/- are pledged with Banking Companies for over-draft arrangements). ... | 8,76,310—37 | |
| 645—00 | (2) Shares: Ordinary Shares Fully paid up of the Face Value of Rs. 600/- (Market value Rs. 600/-) ... | 645—00 | |
| Nil | (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (4) Other Investments ... | Nil | |
| Nil | (5) Gold ... | Nil | |
| 6,94,259—11 | 5. **Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors) | | 6,46,893—92 |
| | (1) Loans, Cash-Credits, Over-drafts etc. | | |
| 6,92,259-11 | (1) In India ... | 6,41,893—92 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | |
| | (2) Bills Discounted and Purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| 2,000-00 | (1) Payable in India ... | 5,000—00 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | |
| | **Particulars of Advances** | | |
| 4,67,145—25 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 4,36,043—20 | |
| 1,73,919—69 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 1,72,289—26 | |
| Nil | (3) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtor ... | Nil | |
| 53,194—17 | (4) Debts considered doubtful or Bad, not provided for | 38,561—46 | |
| 6,94,259—11 | (Exclusive of Rs. 33,130—37, included in item No. 2, fully provided for in the Reserve for Bad and Doubtful Debts as per Contra.) ... | 6,46,893—92 | |
| Nil | (5) Debts due by the Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil | |
| 8,908—75 | (6) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of Private companies, as Members. ... | 8,908—75 | |
| Nil | (7) Maximum Total Amount of advances including Temporary Advances, made at any time during the years to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil | |
| 16,97,307—92 | Carried over ... | | 17,61,702—78 |

# BHOR STATE BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 | CAPITAL & LIABILITIES | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| 17,72,475—75 | Brought forward ... | | 18,41,047—60 |
| 8,058—66 | 8. **Profit and Loss Account.** | | |
| 4,453-73 | Profit as per last Balance Sheet. ... | 8,058—66 | 4,979—87 |
| | *Less*. Appropriations :— | | |
| 3,000-00 | Provision for Bad and doubtful debts. 3,000/- | | |
| 900-00 | Reserve Fund. 1,600/- | | |
| 400-00 | Provision for Income-tax. 3,300/- | 7,900—00 | |
| 153-73 | | 158—66 | |
| 7,904-93 | *Add* : Net profit for the year (subject to taxation) brought form the Profit and Loss account. | 4,821—21 | |
| Nil | 9 **Contingent Liabilities** Nil | | |
| 17,80,534—41 | Total Rs. ... | | 18,46,027—47 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER, 1958.

| 31-12-1957 | EXPENDITURE | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| 42,568—56 | 1. Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | | 44,827—62 |
| 24,558—28 | 2. Salaries and Allowances and Provident Fund : | | 25,272—86 |
| 2,898-33 | (1) Manager Director, Manager or Chief Executive Officer. ... | 3,180—00 | |
| 21,659-95 | (2) Others. ... | 22,092—86 | |
| 1,827—00 | 3. Directors and Local Committee Members' Fees and Allowances ... | | 2,011—53 |
| 3,713—82 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 3,992—29 |
| 1,333—03 | 5. Law Charges. ... | | 1,158—97 |
| 962—96 | 6. Postage, Telegram and Stamps. ... | | 957—66 |
| 498—84 | 7. Auditors' fees and Expenses. ... | | 523—73 |
| 1,966—14 | 8. Depreciation on and repairs to the Banking Company's Property. ... | | 1,861—50 |
| 1,598—45 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 1,243—28 |
| Nil | 10. Loss from sale of or dealing with Non-Banking assets. | | Nil |
| 1,688—85 | 11. Other Expenditure. ... | | 1,540—62 |
| Nil | (1) Bad debts written off. ... | 66—99 | |
| 842-39 | (2) Sundry Charges. ... | 566—72 | |
| 677-99 | (3) Travelling and Conveyance. ... | 746—29 | |
| 168-47 | (4) Telephone Charges ... | 160—62 | |
| 7,904—93 | 12. Balance of Profit (subject to taxation) transferred to Balance Sheet. ... | | 4,821—21 |
| 88,620—86 | Total Rs. ... | | 88,211—27 |

| 31-12-1957 | INCOME (Less provision made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisons). | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| 82,658—99 | 1. Interest and Discount. ... | | 82,154—89 |
| 1,806—52 | 2. Commission, Exchange and Brokerage. ... | | 2,087—01 |
| 448—00 | 3. Rents. ... | | 503—37 |
| Nil | 4. Net Profit on sale of Investments, gold and silver, land and premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account). ... | | Nil |
| Nil | 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account) ... | | Nil |
| Nil | 6. Income from Non-Banking assets and Profit from sale or dealing with such assets ... | | Nil |
| 3,707—35 | 7. Other receipts. ... | | 3,466—00 |
| 50-00 | Share Transfer fees and spliting fees. ... | 11—00 | |
| 543-50 | Safe Custody charges. ... | 939—00 | |
| 810-87 | Study receipts. ... | 33—18 | |
| 2,302-98 | Supervision charges. ... | 2482—77 | |
| Nil | Gain on conversion (Net). ... | 0—05 | |
| Nil | 8. Loss (if any) | | Nil |
| 88,620—86 | Total Rs. ... | | 88,211—27 |

**Y. S. Joshi,** *Manager.* **M. V. Shingre,** *Chairman.* **N. P. Thopte,** *Vice-Chairman.*

—*Directors.*—

**Y. D. Khole,** **B. G. Dhanduke.** **G. B. Devi**

Shri. C. R. Rathi has not signed as he was not present for the meeting.

# LIMITED, BHOR.

## AT 31st DECEMBER, 1958

| 31-121957 | PROPERTY & ASSETS | 31-12-1958 | |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 17,61,702—73 |
| 8,908—15 | (8) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 8,908—75 | |
| Nil | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| 19,093—54 | 6. Bills Receivable, being Bill for Collections as per contra. | | 11,237—12 |
| 19,093—54 | (1) Payable in India ... | 11,237—12 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | |
| Nil | 7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Obligations as per Contra : ... | | Nil |
| 24,155—70 | 8. Premises Less Depreciation ... | | 22,961—70 |
| 26,869—66 | As per last Balance Sheet, (at cost) ... | 26,910—86 | |
| 4,120—00 | *Add* : Additions during the Year. ... | Nil | |
| 26,910—86 | | | |
| 2,755—16 | *Less* : Depreciation written off. ... | 26,910—86 | |
| | | 3,949—16 | |
| 9,442—04 | 9. Furniture and Fixtures. | | 8,794—54 |
| 23,689—57 | As per last Balance Sheet ... | 23,689—57 | |
| Nil | *Add* : Additions during the year. ... | Nil | |
| 14,247—53 | *Less* : Depreciation written off. ... | 14,895—03 | |
| 30,535—21 | 10. Other Assets including Silver | | 41,281—33 |
| 6,974—71 | (1) Interest accured but not received ... | 7,056—78 | |
| 500—00 | (2) Stock of Printing and Stationery on hand (as valued and certified by the Manager). ... | 1,500—00 | |
| Nil | (3) Interest due but not collected. ... | 3—07 | |
| 7,756—17 | (4) Sundry Debtors (Rs. 893—30 being considered Doubtful and not provided for) ... | 6,130—06 | |
| Nil | (5) Stamp Accounts. ... | Nil | |
| 15,304—33 | (6) Income Tax Paid at source ... | 23,661—75 | |
| Nil | (7) Branch Adjustment A/C. ... | 2,528—17 | |
| Nil | (8) Safe Custody Charges. ... | 371—50 | |
| Nil | 11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims | | Nil |
| Nil | 12. Profit and Loss Account | | Nil |
| 17,80,534—41 | Total Rs. ... | | 18,46,027—47 |

### REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Bhor State Bank Limited, as at 31st December, 1958 and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated unaudited returns from all the Branches in India not visited by us for the purposes of this Report.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of Section 211 and 227 of Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule to the Companies Act, 1956; they are, therefore, drawn up in conformity with Forms A & B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank; (c) in our opinion, proper books of account are required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank; (d) the Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns; (e) in our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956; in the manner so required for banking companies and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1958, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended on that date.

Poona City,
2nd March, 1959

GADRE & BHIDE,
Chartered Accountants.

### सरकारच्या मंजुरीशिवाय संचालकांस मेहनताना ३१० व्या कलमाखाली मंजुरीची आवश्यकता

काहीं कंपन्यांच्या संचालकांस, त्यांनीं सदर कंपन्यांसाठी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांच्या वाजवी खर्चांबरोबरच, मध्यवर्ती सरकारची मंजुरी घेतल्याशिवाय पगारादाखल मोठमोठ्या रकमा दिल्या गेल्याचीं काहीं प्रकरणें सरकारच्या निदर्शनास आलीं आहेत. १९५६ च्या कंपनी कायद्यांतील ३१० व्या कलमानुसार अशी मंजुरी घ्यावी लागते.

एका कंपनीच्या संचालकास मेहनताना म्हणून १२,००० रु. दिल्याचें अलीकडे एका प्रकरणीं दिसून आलें आहे. यासंबंधीं सरकारनें चौकशी करतां सदर कंपनीनें असें म्हटलें कीं संबंधित संचालक वकील असून त्यांची वकिली जोरांत चालते; या वकिलास कंपनीच्या कामासाठी बाहेरच्या कोर्टांत जावें लागत असे. त्याबद्दलची किमान फी म्हणून सदर रकम त्यास देण्यांत आली आहे. सदर कंपनीनें ही गोष्टहि स्पष्ट केली आहे कीं ही रकम संचालकास मेहताना म्हणून देण्यांत आली. या संचालकाची उपरोक्त कायद्याच्या ३१४ व्या कलमानुसार त्यास फायदा करून देणाऱ्या जागेवर नेमणूक झाली नसली तरी त्यानें केलेली ही कामगिरी संचालक या नात्यानें त्याकडून अपेक्षित अशा कामांत मोडत नाहीं.

या संबंधांत योग्य त्या प्रकरणीं ३१४ कलमाचें काटेकोर पालन करावें लागेल ही गोष्ट मध्यवर्ती सरकार कंपन्यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनाकरितां स्पष्ट करू इच्छिते. एखाद्या संचालकास त्याच्याकडून अपेक्षित अशा कामाबद्दल मेहनताना द्यावयाचा झाल्यास त्यासाठी सदर कायद्याच्या ३१० व्या कलमानुसार मध्यवर्ती सरकारची मंजुरी घ्यावी लागेल.

---

### छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाची आंकडेवारी माहिती

दहा किंवा त्याहून जास्त कामगार असलेल्या छोट्या औद्योगिक कारखान्यांची महत्त्वाची आंकडेवारी व इतर माहिती गोळा करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाच्या परिस्थितीची स्पष्ट कल्पना येण्यासाठी त्यांस अधिक चांगल्या प्रकारें व लवकर साह्य करण्याच्या हेतूनें ही गोष्ट करण्यांत येत आहे.

तदनुसार दहा किंवा त्याहून जास्त कामगार असलेल्या छोट्या औद्योगिक कारखान्यांची नोंदणी करून घेण्याचा अधिकार राज्यांच्या उद्योगधंदे डायरेक्टरांस देण्यांत आला आहे. या छोट्या कारखान्यांनीं या डायरेक्टरांकडे दर तीन महिन्यांनीं आपल्या कारखान्यांतील उत्पादनाची माहितीहि पाठवावी. नोंदणी करण्याचे तसेंच त्रैमासिक उत्पादन आंकडेवारी भरण्याचे फॉर्म स्टेट डायरेक्टोरेटस ऑफ इंडस्ट्रीजच्या निरनिराळ्या प्रादेशिक भाषा विभागांकडे मिळूं शकतील. या फॉर्म्सच्या प्रती संबंधित राज्यांतील स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस डायरेक्टरांकडेहि पाठवाव्यात.

---

### सर व्हिक्टर ससून ह्यांचा विवाह

सुप्रसिद्ध कोट्यधीश, सर व्हिक्टर ससून, ह्यांनीं आपल्या अमेरिकन नर्सशीं बहामांत नुकताच विवाह केला. पतीचें वय ७७ असून पत्नी ३९ वर्षांची आहे.

### युनायटेड वेस्टर्न बँकेची मुंबईतील तिसरी शाखा

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा, ची मुंबईतील तिसरी शाखा दादर येथें गुरुवार दिनांक ९-४-१९५९, गुढी पाडव्याचे दिवशीं उघडण्यांत आली. त्या दिवशीं सायंकाळीं ५ ते ७ पर्यंत पानसुपारी समारंभ करण्यांत आला. वर्षप्रतिपदेचे मुहूर्तावर ग्राहकांना आपले व्यवहाराची सुरुवात करतां यावी अशा हेतूनें त्या दिवशीं सकाळीं ९ ते १२ व दुपारीं २ ते ४ पर्यंत नवीन खातीं उघडण्याची खास व्यवस्था केलेली होती. शाखेचा पत्ता "लतीफ बिल्डिंग", व्हिन्सेंट रोड, दादर-मुंबई १४, असा आहे.

---

### विटा मर्चंटस् को. बँकेच्या इमारतीचे नियोजित जागेचा भूमिपूजन समारंभ

दि विटा मर्चंटस को. बँकेच्या इमारतीचे नियोजित जागेचा भूमिपूजन समारंभ दक्षिण सातारा जिल्ह्याचे कलेक्टर व सांगली बँक लिमिटेड, सांगली, चे चेअरमन श्री. रा. ग. शिंदे, आयू. ए. एस्. यांचे हस्तें नूतन वर्षारंभाच्या शुभदिनीं गुरुवार दि. ९ एप्रिल १९५९ रोजीं सकाळीं ९ वाजतां झाला.

---

प्राणिसंग्रहालयासाठी गेंडे—बर्लिनमधील प्राणिसंग्रहालयासाठी दोन हिंदी गेंडे पकडण्यांत आले आहेत. हीं गेंड्यांचीं पिल्लें पकडण्याच्या कामीं आसामच्या राज्य सरकारनें मदत केली होती. गेंडे क्वचित् सांपडणाऱ्या जातीचे असून त्यांच्या नाकावर एकच शिंग आहे. त्यांची पाठवणी बर्लिनला विमानानें करण्यांत येणार आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

—भांडवल (३१-१२-५८)—

वसूल झालेलें भांडवल (भागापोटीं आगाऊ जमा झालेल्या रकमा धरून) रु. २८,००,००० चे वर

गंगाजळी व इतर निधि ...रु. १३,००,०००

बँकेकडील ठेवी ...रु. १० कोटी ५६ लक्ष

एकूण खेळतें भांडवल ...रु. बारा कोटींचे वर

**बँकेची तीन व पांच वर्षे मुदतीचीं कॅश सर्टिफिकिटें पाडव्याचे मुहूर्तावर सुरू झालीं आहेत.**

बँकेचे शेअर्स मुंबई स्टॉक एक्सचेंजवर असून अधिकृत ब्रोकरमार्फत त्यांची खरेदीविक्री करतां येते.

हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना (पुणें), सोलापूर (फलटण गल्ली शाखा), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्करवाडी, पनवेल व ठाणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत.

**विशाल महाराष्ट्रांत व इतरत्र ४४ शाखा.**

मुख्य कचेरी थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. } चिं. वि. जोग, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.